सामाजिक न्याय विभाग

ज्येष्ठ नागरिकांसाठी शासन संवेदनशील मुख्यमंत्री वयोश्री योजनेतून लाभ देणार

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा देणाऱ्या मुख्यमंत्री वयोश्री योजनेस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

दोन लाख रुपये वार्षिक उत्पन्न मर्यादित ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ होईल. यामध्ये प्रामुख्याने ज्येष्ठांमध्ये अपंगत्व, अशक्तपणा याचे निराकारण करण्यासाठी आवश्यक उपकरणे खरेदी करणे तसेच मानसिक स्वास्थ संतुलित ठेवण्यासाठी मनस्वास्थ्य केंद्रे व योगोपचार केंद्रांद्वारे प्रबोधन व प्रशिक्षण देण्यात येईल. याची अंमलबजावणी ग्रामीण भागासाठी जिल्हाधिकारी व शहरी भागांसाठी आयुक्तांमार्फत केली जाईल. यासाठी आरोग्य विभागांमार्फत ज्येष्ठ नागरिकांचे सर्वेक्षण व स्क्रिनींग करण्यात येऊन लाभार्थ्यांची तपासणी करण्यात येईल आणि पात्र लाभार्थींना तीन हजार रुपये एकरकमी थेट लाभ त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. या योजनेसाठी ४८० कोटी रुपयांच्या खर्चास देखील या बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यात सध्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या सव्वा ते दिड कोटींच्या दरम्यान आहे. त्यामध्ये अपंगत्व आणि मानसिक अस्वास्थ्याने पिडीत सुमारे पंधरा लाख ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ मिळेल. केंद्राची राष्ट्रीय वयोश्री योजना राज्यातील निवडक जिल्ह्यात राबवण्यात येते. मात्र मुख्यमंत्री वयोश्री योजना राज्यातील सर्व जिल्ह्यात राबवण्यात येईल.

-----०-----फेस्काॅम परिवारातील सर्व  मित्रांनो.महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, मा. नामदार, एकनाथजी शिंदे साहेब व त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी यांनी वरील प्रमाणे तळागाळातील ज्येष्ठांच्या साठी महत्वाचा निर्णय घेतला आहे. फेस्काॅम च्या वतीने त्यांचे अभिनंदन व आभार,!!...श्री.अरुण रोडे. अध्यक्ष फेस्कॉम.

माननीय शिंदे साहेब यांचे सरकार आल्यापासून ज्येष्ठांचे बरेचसे प्रश्न मार्गी लागले आहेत आणि आजची ही बातमी देखील त्याचाच एक भाग आहे

ज्येष्ठांना सुखाचा घास

हाच माननीय शिंदे साहेबांचा ध्यास

जे का रंजले गांजले त्याशी म्हणे जो आपुले

ते एकच एक नाथ

ते माननीय शिंदे एकनाथ 🙏🙏 श्री. अण्णासाहेब टेकाळे, उपाध्यक्ष फेस्कॉम.

03:40 PM